# दि.२१.०१.२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त..

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ), जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दि.२१.०१.२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाली. सभेसाठी सोबतच्या यादीप्रमाणे उद्योग संघटनांचे प्रतिनिधी व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सुरुवात केली. सभेत खालील मुद्यांवर चर्चा झाली.

## अ ) सभेत चर्चेसाठी असलेले विषय

| अ. क्रं. | मुद्दा | चर्चेची संक्षिप्त माहिती | सभेतील निर्णय | संबंधित कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. | | |
| २ | ट्रक टर्मिनल्स बांधकामाबाबत .. | श्री. शि. आ. दराडे, कार्यकारी अभियंता, मऔविम, औरंगाबाद यांनी सांगितले की, अमेंनिटी जागेमधून ट्रक टर्मीनलस करता जागा उपलब्ध करता येणार नाही असे एम.आय.डी.सी. मुख्यालयाने कळविले आहे. त्यामुळे ओपन स्पेस मधून ट्रक टर्मीनलसाठी जागेचा प्रस्ताव पाठविण्यांत येणार आहे. | ओपन स्पेस मधून जागा निवडीचा प्रस्ताव पाठवावा असे ठरले. | कार्यकारी अभियंता, मऔविम, औरंगाबाद. |
| ३ | मऔविम परिसरातील पथदिव्यांना भारनियमन नसणे बाबत. | श्री. शि. आ. दराडे, कार्यकारी अभियंता, मऔविम, औरंगाबाद यांनी एम.आय.डी.सी.क्षेत्रामध्ये फक्त सोमवारीच भारनियम असते ईतर वेळेस दिवे चालू असतात असे सांगितले . त्याशिवाय सौर उर्जेवर अधारीत दिवे प्रायोजीक तत्वार वाळूज एम.आय.डी.सी येथे उभारण्यांत येण्यार असून त्याच्या यशस्वीतेनंतर जालना एमआयडीसी चे काम हाती घेणेत येईल. मा.अध्यक्षांनी तोपर्यंत मुद्या स्थगित ठेवणे बाबत सुचित केले. | मुद्या स्थगित. | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | मऔविमं मध्ये सर्व उद्योग घटकांनी नामफलक लावणे बाबत. | श्री.परळीकर,उपअभियंता, एमआयडीसी यांनी पाच ठिकाणी नामफलक लावण्यांत आले असून उर्वरीत काम लवकरच पूर्ण होईल असे सांगितले. मा.अध्यक्षांनी असे सुचविले की, काम पुर्ण करुन पुढील बैठकी पूर्वी अहवाल द्यावा असे सांगितले. | यावर मा. अध्यक्षांनी असे सूचित केले की, कार्यवाही करुन पुर्तता अहवाल पुढील बैठकीपुर्वी सादर करावा. | कार्यकारी अभियंता, मऔविमं, जालना. |
| ५ | मऔविमं क्षेत्रातील अतिक्रमणे हटविणे. | श्री.दराडे, कार्यकारी अभियंता मऔविम यांनी सांगितले की, अतिक्रमन काढणे साठी निवीदा काढण्यांत आली आहे. तसेच पोलीस सरंक्षणासाठी काही अडचण आल्यास मा.जिल्हाधिकारी यांचेशी संपर्क साधावा असे मा.अध्यक्षांनी सुचविल पुर्ण प्रक्रीया करुन फेब्रुवारी-२०१० अखेर अतिक्रमणे हटवावी असे मा.अध्यक्षांनी सुचविले. | फेब्रुवारी-२०१०अखेर मऔविमंने कार्यवाही करावी. | कार्यकारी अभियंता, मऔविमं, जालना. |
| ६ | मऔविमं, टप्पा-१ व टप्पा-२ जालना औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रण.. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्रं , जालना यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या स्थानिक कमीटीने पहीले तिमाही अहवाल फेब्रुवारी-२०१० अखेर द्यावा. असे मा.अध्यंक्षांनी सुचविले. | समितीचा पहीला तिमाही अहवाल फेब्रुवारी-१०२० अखेर द्यावा असे ठरले. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना. |
| ७ | मुद्रांक शुल्क माफीविषयी.. (Stamp Duty Exemption) | श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा उद्योग मित्र यांनी मुंद्राक शुल्क माफीची प्रक्रीयेत विलंब होत असल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणुन दिले. चर्चेमध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी पंधरादिवसाचे आत अतिनिर्णयाची कार्यवाही करावी असे मा.अध्यक्षांनी सुचविले. तथापी औद्यौगिक संघटनांकडून सदरील प्रक्रीयेबाबत आक्षेप न आल्यामुळे मुद्या वगळण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले. | मुद्या तूर्त स्थगित. | मुद्रांक जिल्हाधिकारी, जालना. |
| ८ | मऔविमं जुने औद्योगिक क्षेत्र जोडरस्ता करणे बाबत. | मऔविम जुने औद्योगिक क्षेत्रास जोडणारा रस्ता खराब असल्यामुळे उद्योजकांना अडचणी येतात असे चेअरमन सहकारी औद्योगिक वसाहत यांनी उपस्थीत केला. कार्यकारी अभियंता मऔविम यांनी हा रस्ता मऔविमचे कार्यक्षेत्रा बाहेर असल्यामुळे एमआयडीसी कडुन काम करता येणार नाही असे सांगितले. चर्चे अंति नगर परिषद कडे त्याबाबत कळवावे असे ठरले. | नगर परिषद, जालना यांचेकडे रस्त्या बाबत प्रस्ताव पाठवावा असे ठरले. | मुख्य कार्यकारी, नगर परिषद, जालना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | विद्युत शुल्क माफी मिळणेबाबत ( लघुउद्योग भारती) | मराठवाडा विभागात सर्व उद्योग धटकांना विद्युत शुल्क माफी वर्षे २०१४ पर्यंत लागू असल्याचे शासन निर्णय असल्यामुळे म.रा.वि.वि.कंपनीने वेगळया प्रमाणपत्राची मागणी न करता सरसकट विद्युत शुल्क माफी द्यावी असे सर्वानुमते ठरले. विद्युत कंपनीचे अधिकारी बैठकीस उपस्थित नसल्यामुळे विस्तृत चर्चा होवू शकली नाही, त्याबद्यल अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. | अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी यांनी विद्युत शुल्क माफीसाठी वेगळया प्रमाणपत्राची मागणी करु नये व सरसकट सर्व घटकांना विद्युत शुल्क माफी द्यावी असे ठरले. | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, जालना |
| | | | | |

सदस्य सचिव श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जालना.**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जालना.**

## दि.२१.०१.२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या जिल्हा सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त..

जिल्हा सल्लागार समिती सभा मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ), जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दि.२१.०१.२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाली. सभेसाठी सोबतच्या यादीप्रमाणे उद्योग संघटनांचे प्रतिनिधी व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सुरुवात केली. सभेत खालील मुद्यांवर चर्चा झाली.

### अ ) सभेत चर्चेसाठी असलेले विषय

| अ. क्रं. | मुद्दा | चर्चेची संक्षिप्त माहिती / सभेतील निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. |
| २ | जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविल्या जाणा-या विविध योजनांचा आढावा | महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव यांनी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविल्या जाणा-या सुधारित बीजभांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्जयोजना, उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, जिल्हा पुरस्कार याविषयीची ठळक वैशिष्टये सांगून माहे डिसेंबर-२००९ अखेर प्रगती ( उद्दिष्ट/साध्य/खर्च ) अहवाल सादर केला.<br>मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम विशेष घटक योजना / इत्यादी कार्यक्रमांवरील तरतूद माहे फेब्रुवारी-२०१० पर्यन्त खर्च व्हावी. यावर सदस्य सचिव व महाव्यवस्थापक यांनी सभागृहास माहिती दिली की, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत वर्ग जिल्हयात विविध ठिकाणी सुरु आहेत व सर्व योजनेतंर्गतचे खर्च व उद्दिष्टे वेळेच्या आत पूर्ण करण्यात येईल. |
| ३ | सन २००९ साठी उद्योग घटकांची जिल्हा पुरस्कारासाठी निवड करणे. | सन-२००९ साठी जिल्हा पुरस्कार योजने अंतर्गत ४ अर्ज प्रापत झालेले आहेत. त्यापैकी तीन घटक पात्र ठरले. सर्व घटकांना उपसमितीने भेट दिली व गुणानुक्रमे प्रथम दोन घटकांची निवड झाल्याची घोषणा मा.अध्यक्षांच्या मान्यतेने करण्यांत आली.<br>**१. प्रथम पुरस्कार** — **मे.वैद्यही इंडस्ट्रीज डि-६४ अति.एमआयडीसी, जालना भागीदार सतिश कुमार स्वरुप नारायण भक्कड.**<br>**२. द्वितीय पुरस्कार** — **मे.सागर स्टोन क्रशर गट क्रं.३० देऊळगांव उगले ता जाफ्राबाद मालक संतोष रामराव लोखंडे रा.खामगांव.** |

सदस्य सचिव श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी मा. अध्यक्षांच्या वतीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा सल्लागार समिती सभा,**
**जालना.**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा सल्लागार समिती सभा,**
**जालना.**

**जिल्हा उद्योग केंद्र, जालना**
**सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठया व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये**
**किमान ८० % स्थानिक उमेदवारांना नोक-यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबतची सभा**
**दि.२१.०१.२०१० रोजी दु.१२.३० वाजता संमपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त**
**शासन निर्णय क्रं.स्थालोरो-२००८/प्रक्र.९३/उद्योग-६ दि.१७ नोव्हेंबर, २००८**

---

सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठया व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० % स्थानिक उमेदवारांना नोक-यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबतची सभा दि.२१.०१.२०१० रोजी दु.१२.३० वाजता मा.जिल्हाधिकारी , जालना यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेसाठी खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री. विलास ठाकूर, भा.प्र.से. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा कार्यपथक समिती, जालना.
२. श्री. अ.र.चांदोरीकर, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा कार्यपथक समिती, जालना
३. श्री.अशोक चौधरी, प्रादेशिक अधिकारी, मऔविमं, औरंगाबाद
४. श्री. सुभाष अजमेरा, अध्यक्ष स्टिल उत्पादक संघटना, जालना
५. श्री. आर.बी.जाधव, प्रभारी व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना
६. श्री.डी.एस.परळीकर, उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जालना
७. श्री.जी.बी.दंदे, प्राचार्य , औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना.

---

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना तथा सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्षांच्या समोर स्थानिक लोकांना रोजगाबाबतची माहे डिसेंबर-२०१० अखेरची उद्योग घटकांबाबतची माहिती सभागृहास सादर केली. उपलब्ध आकडेवारीनुसार जिल्हयातील सर्व घटकांकडे ८० टक्केपेक्षा जास्त स्थानिक कामगार असल्याचे सभागृहास निदर्शनास आणुन दिले. मा.अध्यक्षांनी जिल्हयातील सर्व उद्योग घटकांमध्ये मध्ये शासन निर्णयानुसार सथानिक कामगारांची नियुक्ती करण्यांत आली आहे किंवा नाही याबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा असे सुचित केले. उपस्थित उद्योग प्रतिनिधींनी शासन धोरणानुसारच स्थानिक कामगार कामासाठी असल्याचे सांगितले.

सर्व उपस्थित मान्वरांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे सदस्य सचिवानी जाहीर केले.

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**स्थानिक उमेदवारांना नोक-यांमध्ये प्राधान्य जिल्हा समिती,**
**जिल्हा उद्योग केंद्र, जालना**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**स्थानिक उमेदवारांना नोक-यांमध्ये प्राधान्य जिल्हा समिती,**
**जालना.**

## दि.२१.०१.२०१० रोजी सकाळी १२.१५ वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभेचे इतिवृत्त..

जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ), जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दि.२१.०१.२०१० रोजी सकाळी १२.१५ वाजता संपन्न झाली. सभेसाठी सोबतच्या यादीप्रमाणे उद्योग संघटनांचे प्रतिनिधी व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सुरुवात केली. सभेत खालील मुद्यांवर चर्चा झाली.

### अ ) सभेत चर्चेसाठी असलेले विषय

| अ. क्रं. | मुद्दा | चर्चेची संक्षिप्त माहिती | सभेतील निर्णय | संबंधित कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. | | |
| २ | जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभेबाबतचा आढावा. | श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव यांनी जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसनाबाबत शासनाच्या अलीकडील धोरणाबाबत सभागृहास माहिती दिली. तथापि, सदर योजनेतंर्गत जिल्हा उद्योग केंद्रास एकही अर्ज प्राप्त न झाल्याने यावर चर्चा होऊ शकली नाही. तथापि, सदस्य सचिव व महाव्यवस्थापक यांनी उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय दि.२५.०८.२००९ नुसार सुवर्ण जयंती उद्योग संजीवनी योजनेतंर्गत विशेष अभय योजनेस माहे मार्च, २०१० पर्यन्त मुदतवाढ दिल्याचे सभागृहास सांगितले व याचा लाभ गरजू आजारी उद्योग घटकांनी घ्यावा, असे आवाहन केले. | | |

सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांच्या वतीने सभा संपल्याचे जाहीर केले

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा,**
**जालना.**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा,**
**जालना.**

# जिल्हा उद्योग मित्र, जिल्हा सल्लागार समिती, जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा दिनांक २१.०१.२०१० वेळ दुपारी ११.३० इतिवृत्त

## उपस्थितांची यादी

| अ.क्रं. | उपस्थित अधिकारी / प्रतिनिधी यांचे नांव | हुद्दा | कार्यालयाचे नांव | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ) | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | अध्यक्ष |
| २ | श्री. अनिलकुमार र. चांदोरीकर | महाव्यवस्थापक | जिल्हा उद्योग केंद्र, जालना | सदस्य सचिव |
| ३ | श्री. आर. बी. जाधव | प्रभारी व्यवस्थापक | जिल्हा उद्योग केंद्र, जालना | सदस्य |
| ४ | श्री. अशोक चौधरी | प्रादेशिक अधिकारी | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद | सदस्य |
| ५ | श्री. शि. आ. दराडे | कार्यकारी अभियंता | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद | सदस्य |
| ६ | श्री. दिलीप शेषराव परळीकर | उप अभियंता | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद | |
| ७ | श्री. सुभाष अजमेरा | अध्यक्ष | स्टील उत्पादक संघटना, जालना | सदस्य |
| ८ | श्री. किशोर अग्रवाल | अध्यक्ष | जालना इंडस्ट्रीयल इंटरप्रिन्युर्स असोसिएशन, जालना | सदस्य |
| ९ | श्री. दिपक सोमाणी | अध्यक्ष | लघुउद्योग भारती, जालना | सदस्य |
| १० | श्री. बाळकृष्ण शहापूरकर | क्षेत्र निरीक्षक | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद | सदस्य |
| ११ | श्री. व्ही. आर. भारती | सहाय्यक | क्षेत्र व्यवस्थापक यांचे कार्यालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जालना | सदस्य |
| १२ | श्री.जी.बी.दंदे | प्राचार्य | प्राचार्य, आय. टी. आय. जालना | सदस्य |
| १३ | श्री.ना.अ.कुलकर्णी | प्रतिनिधी | सह जिल्हा निबंधक कार्यालय, जालना | सदस्य |
| १४ | श्री. डी. एस. मोरे | जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी | जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय, जालना | सदस्य |
| १५ | श्री.डी.पी.शाहु | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जालना | सदस्य |
| १६ | श्री. अजय गट्टाणी | सचिव | लघुउद्योग भारती संघटना | सदस्य |
| १७ | सौ.उषा हावळे | सदस्या | जिल्हा उद्योग मित्र समिती,जालना | सदस्या |
| १८ | श्री.डी.एफ.घायवटे | विभागीय व्यवस्थापक | एमएसएफसी | सदस्य |
| १९ | श्री.सुरेंद्र पित्ती | संचालक | एस.आर.जे.पित्ती स्टिल | उद्योजक |
| २० | घनश्याम गोयल | संचालक | कालिका स्टिल | उद्योजक |
| २१ | श्री.बागवान एन.ए | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक | बँक ऑफ महाराष्ट्र जालना | सदस्य |
| २२ | श्री.ओमप्रकाश पंच | चेअरमन | जालना स.औ.व. जालना | सदस्य |
| २३ | श्री.हेमंत कोळेश्वर | मॅनेजर | जालना स.औ.व. जालना | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | श्री.व्ही.एच.जाधव | शाखा व्यवस्थापक | एमएससआयडीसी, जालना | सदस्य |
| २५ | श्री.अनिल गोयल | संचालक | कालिका स्टिल, जालना | उद्योजक |
| २६ | सौ.यु.डी.पाटील | सहा.प्रकल्प अधिकारी | जि.ग्रा.वि.यं.जालना | सदस्य |
| २७ | श्री.विजय मित्तल | संचालक | शिव शक्ती रि रोलींग मिल जालना | उद्योजक |
| २८ | श्री.आशिष भल्ला | संचालक | मेटा रोल्स | उद्योजक |
| २९ | श्री.आर.जितेंद्र | एल.यु.बी. | लघु उद्योग भारती | उद्योजक |
| ३० | श्री.एस.एस.जोशी | सहाय्यक संचालक | औ.सु.व आ.औरंगाबाद | सदस्य |

# दि.२८.१०.२००९ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेतील मुद्दयांबाबतचा अहवाल.

| अ. क्रं. | मुद्दा | चर्चेची संक्षिप्त माहिती | सभेतील निर्णय | अहवाल |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | | | |
| २ | ट्रक टर्मिनल्स बांधकामाबाबत .. | श्री. शि. आ. दराडे, कार्यकारी अभियंता, मऔविम, औरंगाबाद यांनी सभागृहास असे सांगितले की, ट्रक टर्मिनल्सच्या जागेबाबत मुख्य नियोजक ( Chief Planner ), मऔविमं, मुंबई यांचेकडे जागेबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविण्यात आला आहे. साधारणपणे ८ दिवसात मंजुरी मिळेल, अशी माहिती सभागृहास दिली. | मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, संबंधित कार्यालयाकडे पत्राद्वारे आवश्यक तो पाठपुरावा करावा. | ट्रक्टर्मिनल्स बाधकामाबाबत टप्पा क. १मध्ये पुरेशी जागा उपलब्ध नसल्याबाबत मुख्य नियोजक मार्फत सहाय्यक लेखधिकारी मुंबई यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यास आला आहे.तसेच रस्त्याच्याकडेने वाहन उभे करण्यासाठी रुंदी करण्याबाबतचा प्रस्ताव पुढील अर्थसंकल्पी वर्षात तरतुद करुन मंजुरीसाठी सादर करण्यात येईल |
| ३ | मऔविम परिसरातील पथदिव्यांना भारनियमन नसणे बाबत. | श्री. शि. आ. दराडे, कार्यकारी अभियंता, मऔविम, औरंगाबाद यांनी याबाबत सभागृहास माहिती दिली की, मऔविमं जालना क्षेत्रात फक्त सोमवारी सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यन्त पथदिव्यांचा विद्युत पुरवठा खंडीत असतो इतर दिवशी पूर्ण वेळ पथदिवे सुरु असतात. बंदचा कालावधी अत्यंत कमी असल्यामूळे त्यासाठी स्वतंत्र फिडर बसविणे आर्थिक दृष्टया परवडण्याजोगे नाही. त्याला पर्याय म्हणून सौरउर्जेवर चालणा-या दिव्यांचा वापर करण्याची योजना आहे. | यावर, मा. अध्यक्षांनी चर्चेनंतर असे सुचविले की, सौरउर्जेवर चालणारे पथदिवे एक विद्युत भारावरील पथदिवा व त्यानंतर एक सौरउर्जेवरील पथदिवा यानुसार ( One by One ) पथदिवे लावावेत. म्हणजे पर्यायी व्यवस्था आपोआप तयार होईल. चर्चेनंतर उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले. | सौर उर्ज वरील दिवे बाबत. येत्या अर्थसंकल्पी वर्षात तरतुद करुन प्रस्ताव विद्युत व यांत्रीकी विभागा मार्फत मंजुरीसाठी मुख्यलयास सादर करण्यात येईल |
| ४ | मऔविमं मध्ये | श्री. शि. आ. दराडे, कार्यकारी | यावर मा. अध्यक्षांनी असे | क्षेत्रविकास नामफलक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सर्व उद्योग घटकांनी नामफलक लावणे बाबत. | अभियंता, मऔविम, औरंगाबाद यांनी याबाबत सभागृहास माहिती दिली की, या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून निवडणूक आचार संहितेमूळे मान्यता देण्यात आलेले नाही. तसेच मऔविमं क्षेत्रातील रस्त्यांचे दुरुस्तीचे काम रु.१०.०० लाखाचे निविदा काढण्यात आल्या असून त्याचे काम सुरु करण्यात आले आहे. याशिवाय संपूर्ण रस्त्यांच्या कामासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. | सूचित केले की, क्षेत्रनिहाय ( Sector-wise ) नामफलक त्या त्या दर्शनी भागात आगामी जिल्हा उद्योग मित्र सभेपूर्वी लावण्यात यावेत व रस्त्यांच्या कामाचा पाठपुरावा संबंधितांनी करावा. | बसविण्याचे कम प्रगतीपथाव असुन आतापर्यंत पाच नामफलक बसविण्यात आले आहे . त्यांचे रेखांकन लवकर करण्यात येईल. |
| ५ | मऔविमं क्षेत्रातील अतिक्रमणे हटविणे बाबत.. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात मुख्य रस्त्यावर व अंतर्गत रस्त्यावर मोठया प्रमाणावर अतिक्रमण होत असल्यामूळे त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मऔविमं प्रशासनाने कार्यवाही अशी चर्चा झाली. श्री. शि. आ. दराडे, कार्यकारी अभियंता, मऔविम, औरंगाबाद यांनी पोलीस प्रशासनाची मदत मिळाल्यास अतिक्रमण काढण्यात येईल, असे सभागृहास सांगितले. | मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, दि.२९.१०.२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच्या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. याच दिवशी मऔविमं क्षेत्रातील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात यावी व तसा प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक, जालना यांचेकडे प्रस्ताव द्यावा त्यानुसार सदर कार्यासाठी नियमानुसार पोलीस मदत घ्यावी. | औरंगाबाद विभागा मार्फत अतिक्रमण काढण्याबाबत. निविदा काढण्यात आली असुन ती मंजुर केल्यास अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच मा.पेलिस अधीक्षक जालना यांच्याकडे या कार्यलयाचे पत्र क.१३२२ दि.३०.१०.०९ नुसार संरक्षण देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| ६ | मऔविमं, टप्पा-१ व टप्पा-२ जालना औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रण.. | जालना औद्योगिक क्षेत्रात होणा-या प्रदूषणांवर आळा घालण्यासाठी समिती स्थापन करण्याविषयी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने पुढाकार घ्यावा, असे मागील सभेत ठरले होते. तथापि, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी श्री. रेदासनि एस. ए., क्षेत्र अधिकारी, मप्रनिमं, औरंगाबाद यांनी असे सांगितले की, अशी समिती स्थापन करण्याचे अधिकार मुख्यालयास असल्यामूळे सदर प्रस्ताव मुख्यालयास पाठविण्यात आला आहे. मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, प्रदूषण नियंत्रणासाठी सर्व स्टील उद्योग व रोलींग मील घटक यांनी स्थापित केलेल्या प्रदूषण नियंत्रण | याबाबत प्रदीर्घ चर्चा होऊन सर्वानुमते असे ठरले की, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी उद्योजक व प्रशासकीय अधिकारी यातून समिती गठीत करावी व समितीचा पहिला तिमाही अहवाल मा. जिल्हाधिकारी यांना सादर करावा. | स्थानिक कमिटीची स्थापना करण्यांत आलेली असुन प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी सहकार्य न दिल्यामुळे औद्योगीक संघटनेचे १ प्रैतनिधी घेऊन २२ घटकांना समितीने भेट दिली आहे. उर्वरीत घटकांना महिना अखेर भेटी देऊन अहवाल मा. जिल्हाधिकारी यांना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | यंत्रसामुग्रीमधील स्टेज-१ मधील संच कार्यान्वीत ठेवावेत त्याद्वारे प्रदूषणावर निश्चितच आळा ठेवणे शक्य होईल. उपरोक्त स्थानिक समिती गठीत करण्याबाबत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी पुढाकार घ्यावा व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांना सहयोगी सदस्य म्हणून घेण्याबाबत चर्चा झाली. | | सादर करण्यांत येईल.. |
| ७ | मुद्रांक शुल्क माफीविषयी.. (Stamp Duty Exemption) | श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा उद्योग मित्र यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त विषयी सभागृहाला दिलेली माहिती केवळ आय. टी. युनिटच्या संदर्भात आहे ती इतर उद्योग घटकांना किंवा शासन नवीन औद्योगिक धोरणानुसार लागू होत नाही असे सांगितले. यावर श्री. बी. बी. घाग, सह जिल्हा निबंधक, जालना यांनी मुद्रांक शुल्क माफीच्या प्रकरणाचे अधिकार तालुका निबंधकांना नसल्याचे सांगितले. व त्याबाबतचा निर्णय त्यांचे वरिष्ठ कार्यालयाच्या अखत्यारीत येतो असे सांगितले. चर्चेमध्ये मुद्रांक शुल्क माफीच्या प्रकरणात निर्णय घेण्यासाठी मोठा विलंब लागत असल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. | यावर चर्चा होऊन सर्वानुमते असे ठरले की, मुद्रांक शुल्क माफीच्या प्रकरणात अभिनिर्णय एक महिन्याच्या आत घेण्यात यावा व त्याबाबत संबंधितांनी सहमती दर्शविली. | अहवाल अप्राप्त |
| ८ | विद्युत शुल्क माफी मिळणेबाबत. ( लघुउद्योग भारती ) | आयत्या वेळेस लघुउद्योग भारती, जालना औद्योगिक संघटनेने यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा झाली. औद्योगिक धोरणातील घोषित केलेल्या सर्व ड+ प्रवर्गातील उद्योग घटकांना वर्ष २०१४ पर्यन्त विद्युत शुल्क माफी असताना विद्युत कंपनीकडून त्याची आकारणी करण्यात येत असल्याचा मुद्दा लघुउद्योग भारती संघटनेचे संचिव श्री. अजय गट्टाणी यांनी उपस्थित केला व त्यासाठी विद्युत निरीक्षक यांचे प्रमाणपत्र आणण्याची सक्ती कंपनीच्या अधिका-याकडून करण्यात येते असे सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, विद्युत शुल्क माफीचे शासनाचे धोरण असल्यामूळे त्यासाठी वेगळया प्रमाणपत्राची मागणी करण्यात येऊ नये. सदस्य सचिव यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, विद्युत शुल्क माफी देण्याचे अधिकारी जिल्हा उद्योग केंद्राला प्रदान करण्यात आलेले आहे. | चर्चेनुसार व श्री. ए. जे. नवघरे, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, जालना यांनी सांगितले की, पुढील महिन्याच्या विद्युत देयकात विद्युत शुल्काचा समावेश होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. | अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी यांचे कडुन कार्यवाहीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. तथापी औद्योगीक संघटनेच्या प्रैतनिधीं कडुन मिळालेल्या माहितीनुसार सर्व उद्योग घटकांना विद्युत शुल्क आकारणी न करता विद्युत बिले देण्यांत येत आहे. |
| **नविन मुद्ये** | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | चेअरमन सहकारी औद्यो. वसाहत जुनी एम आयडीसी जालना | जुन्या औद्योगीक क्षेत्रातील रस्त्याची दुरुस्ती | | |

**महाव्यवस्थापक तथा,सदस्य सचिव,**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा,जालना.**